Exh No. 22/D

रे.का.नं. 39/2026

मे. दिवाणी न्यायाधीशसो, कनिष्ठ स्तर, कागल,
यांचे कोर्टात

पिरासो हसन नायकवडी (अ.पा.) ——वादी

वि.

मिरासाब बाबू नायकवडी ——प्रतिवादी
वगैरे

Order
-----------
Read and Record

यातील प्रतिवादीतर्फे वादीचे नि-20चे अर्जास म्हणणे पुढीलप्रमाणे —

(1) प्रस्तुतच्या वादीचा अर्ज हा खोटा, चुकीचा, काल्पनिक व मे. कोर्टाची दिशाभूल करणारा असल्याने तो बेकायदेशीर असून त्यातील सर्व कथनांचा प्रतिवादी स्पष्ट शब्दात इन्कार करतात.

(2) प्रस्तुतचा अर्ज हा मनाईचा असल्याचे दिसून येते तसेच वादी यांनी सदर अर्जामध्ये मनाई आदेशाची प्रेअर मागितली आहे परंतु वादीचा नि-5 चा मनाई अर्ज प्रलंबित असताना अशा स्वरूपाचा दुसरा मनाईचा अर्ज कायद्याने देता येणार नाही. एक मनाईचा अर्ज प्रलंबित असताना दुसरा अर्ज T.I. स्वरूपात मंजूर झालेस ते न्यायोचित होणार नाही. या कारणास्तव सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

(3) वास्तविकतः सदर अर्जातील सर्व कथने खोटी व मे. कोर्टाची दिशाभूल करणारी आहेत. सदर दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कोणताही कायदेशीर हक्कसंबंध नाही. सदर मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकती असून यापैकी चौकशी उतारा पाहिला असता त्यास धारक म्हणून प्रतिवादी यांची नावे नमुद आहेत. ही बाब वादी यांना माहित आहे. त्याप्रमाणेच पुढे सि.टी.सर्व्हे झालेनंतर दावा मिळकतीस प्रतिवादी यांची नावे नमुद झाली होती. ही बाब ~~प्रति~~वादी यांना मान्य व कबुल होती. त्याबाबत वादी यांनी महसूल दफ्तरी कोणतीही तक्रार दिलेली नव्हती.

(4) प्रस्तुत दावा मिळकती संदर्भात वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान दि. 17/8/1990 इ. रोजी रु. 10 चे स्टॅम्प वरती प्राथमिक स्वरूपाचे वाटणीपत्र झाले आहे. व त्यानुसार दावा मिळकती या प्रतिवादीच्या कब्जे वहिवाटीस आहेत. परंतु मे. जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख कोल्हापूर यांचेकडील अपील प्रस. आर. नं. 621/2019 याचा निर्णय वादीचे बाजूने झालेनंतर वादींनी दावा मिळकतीमध्ये जबरदस्तीने घुसून बांधकाम करण्याचा बेकायदेशीर प्रयत्न केला होता त्यावेळी यातील प्रतिवादी यांनी वादीविरुद्ध रे.का.नं. 189/2024 चा कायम मनाईचा दावा दाखल केला आहे. यातील वादी यांनी तो दावा न्यायप्रविष्ट ~~आ~~ टाळाटाळ केली आहे. त्यामुळे वादी त्यांचे मनाई अर्जामध्ये ~~नमुद~~

पॅरा नं - ३ मध्ये नमुद केलेली R.C.C. जुनी भिंत प्रतिवादी पाडू लागले हे कथन मे. कोर्टाची दिशाभूल करणारे आहे. वास्तविकत: सदरची भिंत प्रतिवादी यांचे क्षेत्रात घुसून वादी हे बांधकाम करत होते. म्हणून यातील प्रतिवादी यांनी मनाईचा दावा दाखल केला होता. तशी cause of Action. प्रतिवादींचे दाव्यामध्ये नमुद आहे. त्यामुळे प्रतिवादी हे वादींचे क्षेत्रास हरकत अडथळा करण्याचे भासवून वादी मे. कोर्टाकडून चुकीचा आदेश आपल्या हक्कात पारित करून घेण्याचा बेकायदेशीर प्रयत्न करित आहेत.

(5) प्रस्तुत दावा मिळकती संदर्भात यापूर्वीच प्रतिवादी यांचा दावा प्रलंबित असल्याने व त्याकामी यातील वादींचे पूर्वहक्कदार पिरासो नायकवडी हे मयत झालेने वारस रेकॉर्डवर घेणेबाबत या अर्ज दिलेला आहे व तो प्रलंबित आहे. अशी - वस्तुस्थिती असताना एकाच मिळकती संदर्भात दोन दावे व मनाई अर्ज प्रलंबित असताना ~~...~~ दोन्ही मनाई अर्जावरती एकत्र म्हणणे आलेनंतर सदर अर्ज गुणदोषावर चालून आदेश होणे गरजेचे आहे. परंतु नि - ५ प्रलंबित असताना दुसरा T.I. अर्ज मंजूर केलेस

प्रतिवादी यांचे नैसर्गिक न्यायहक्काला बाधा निर्माण होणार आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी यांची सहती धारकिळकत असल्याने प्रतिवादी ती मिळकत विक्री करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादीच्या दावा त्यातील कथने पाहता ती मे. कोर्टाची दिशाभूल करणारी आहेत. प्रतिवादी यांची नावे दावामिळकतीस मे. उपसंचालक सो, भूमी अभिलेख, पुणे. यांचेकडील द्वितीय अपील एस.आर. नं. 5861/2022 चे अपीलाच्या निकाल प्रतिवादी यांचे बाजूने झालेनंतर सदर मिळकतीस कायदेशीररित्या प्रतिवादी यांचे नावाचा अंमल दावामिळ-कतीचे मालक सदरी झालेला आहे. त्यामुळे दावामिळकतीस प्रतिवादी यांचे नाव असून ते मिळकत विक्री करू शकतात असे मे. कोर्टास चुकीचे भासवून वादी हे मनाईचा आदेश पारित करून घेऊ पाहत आहेत. म्हणून रे.क.नं. 189/2024 व या कामातील मनाई अर्ज एकत्रित चालणे कायद्याने आवश्यक आहे. सदर दाव्यास Tenancy in common ची बाधा निर्माण होते. त्यामुळे घाईगडबडीत आदेश पारित झाल्यास प्रतिवादीचे नुकसान होणार आहे.

(६) सबब, मे. कोर्टास विनंती की,

अ) वादीचा नि-२० चा मनाई अर्ज कायद्याने चालणेस पात्र नसलेने तो नामंजूर करणेत यावा.

5

ब) जरूर तर म्हणणे दुरुस्तीस परवानगी असावी.

क) न्यायाचे इतर अनुषांगिक हुकूम यावकामी प्रतिवादी यांचे बाजूने व्हावेत.

येणेप्रमाणे म्हणणे असे.

कागल

दि- 11/04/2026

मे. जा. व्हावे.

PPH Adv
(Adv. P.P. Havaldar)
प्र.वा. तर्फे वकील

PRANITA SUHAS PATIL

Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.11 13:04:16 +0530